**प्रेसनोट** **दिनांक १८/०५/२०१९**

## येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

## कम्युनिटी पोलीसीग व बडीकॉप संकल्पने अंतर्गत बजाज अलायन्स, गुंजन चौक, येरवडा येथील महिला व पुरूष सुरक्षा कर्मचायांची बैठक घेवून त्यांना मागदर्शन केले

---

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या कम्युनिटी पोलिसींग व महिला नोकरदार वर्गाचे सुरक्षेच्या दृष्टीने राबविण्यात येणारे बडीकॉप या संकल्पने अंतर्गत, दि. १८/०५/२०१९ रोजी श्री. अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), अतिरिक्त कार्यभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे.यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी पर्णकुटी पो.चौकीचे हद्दीतील बजाज अलायन्स, गुंजन चौक, येरवडा, पुणे येथील महिला व पुरूष सुरक्षा कर्मचायांची दि.१८/०५/२०१९ रोजी १४:५५ वा. ते १६:१५ वा. चे दरम्यान बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये त्यांनी बजाज अलायन्स कंपनीतील महिला व पुरूष सुरक्षा कर्मचारी यांना नोकरदार महिला वर्गासाठी सुरू असलेल्या बडीकॉप संकल्पनेची माहिती देण्यात आली. तसेच त्यांना त्यांचे कंपनीतील सुरक्षेच्या दृष्टीने घ्यावयाची दक्षता, उपाययोजना याबाबत तसेच तेथे नोकरीस असलेल्या महिला कर्मचायांचे सुरक्षा विषयक मार्गदर्शन केले. तसेच त्यांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे १४ योजनांची माहिती देण्यात आली.

अशा प्रकारे श्री.अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अतिरिक्त कार्यभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलिसींग व बडीकॉप संकल्पने अंतर्गत बजाज अलायन्स, गुंजन चौक, येरवडा, पुणे येथील महिला व पुरूष सुरक्षा कर्मचायांची बैठक घेऊन त्यांना सुरक्षेबद्दल माहिती देऊन उल्लेखनिय कामगिरी केली आहे.



